सकाळ TODAY
कोल्हापूर, गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे स्मृती भवनात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त खाशाबा जाधव यांच्या क्रीडा साहित्यासह चित्रांचे प्रदर्शन पाहताना रसिक.

# 'खाशाबां'च्या क्रीडा साहित्याचे विवेकानंद महाविद्यालयात प्रदर्शन

कोल्हापूर, ता. २ : ऑलिंपिकमध्ये भारताला कुस्तीतील वैयक्तिक पहिले ब्राँझपदक मिळवून देणारे ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांचे क्रीडा साहित्य, छायाचित्रे, वर्तमानपत्रातील लेखांसह इतर साहित्याचे प्रदर्शन विवेकानंद महाविद्यालयातील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवनमध्ये आयोजित केले आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित केलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते झाले. यानिमित्त क्रीडा क्षेत्रात उल्लेखननीय कामगिरी करणाऱ्या राष्ट्रीय खेळाडू श्लोका शिंदे (तलवारबाजी), वैष्णवी कुशाप्पा (कुस्ती), श्रीनंदन मालपाणी (योग), श्रीवर्धन पाटील (जलतरण), नेहाली पाटील (टेबल टेनिस) यांचा सत्कार करण्यात आली. श्रीनंदन मालपाणी याने योगाच्या प्रात्यक्षिकांतून गणेशवंदना सादर केली. जिमखानाप्रमुख डॉ. विकास जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संतोष कुंडले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.प्रशांत कांबळे यांनी आभार मानले.

दैनिक

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

● गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६



कोल्हापूर : शहर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड झालेल्या प्रा. सुनील जगताप यांचा सत्कार करताना पदाधिकारी.

# कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना उपाध्यक्षपदी प्रा. जगताप

## सर्व पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदन

**जनप्रवास : कोल्हापूर**

जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघ संलग्न कोल्हापूर शहर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षपदी विवेकानंद कॉलेजमधील प्रा. सुनील जगताप यांची निवड करण्यात आली. म. ल. ग. हायस्कूल येथे बैठक पार पडली.

या बैठकीत संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा झाली. तसेच पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांचे विवेकानंद महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी महासंघाचे राज्य कार्यकारिणी कार्याध्यक्ष अविनाश तळेकर, जिल्हाध्यक्ष अभिजीत दुर्गी, जिल्हा सरचिटणीस प्रा. संजय मोरे, जिल्हा सहसचिव बसाप्पा मडीवाळ, उपाध्यक्ष शिवाजीराव होडगे, शहर अध्यक्ष अमरसिंह शेळके आदी उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६

# ऋतुजा एकुंडे यांना पीएच.डी. जाहीर

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाची



संशोधक विद्यार्थीनी ऋतुजा एकुंडे यांना शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी जाहीर झाली आहे. त्यांनी "स्टडीज ऑन द फोटोथर्मल सुपरहायड्रोफोबिक कोटिंग्स फॉर सेल्फ-स्टेरिलायझेशन अँड सेल्फ - क्लिनिंग एप्लिकेशन्" हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. डॉ. संजय लठ्ठे आणि जत येथील राजे रामराव महाविद्यालयाचे डॉ. आप्पासाहेब भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे,प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक सचिन धनवडे यांचे सहकार्य लाभले.

पुण्यनगरी

गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६

# प्रा. सुनील जगताप यांची निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या कनिष्ठ विभागातील इंग्रजी विषयाचे अधिव्याख्याता प्रा. सुनील जगताप यांची कोल्हापूर शहर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाशी संलग्न असलेल्या शहर संघटनेची बैठक म. ल. ग. हायस्कूल येथे झाली. बैठकीस महासंघाचे राज्य कार्यकारिणी कार्याध्यक्ष अविनाश तळेकर, जिल्हाध्यक्ष अभिजित दुर्गी, जिल्हा सरचिटणीस प्रा. संजय मोरे, जिल्हा सहसचिव बसाप्पा मडीवाळ, उपाध्यक्ष शिवाजीराव होडगे, शहराध्यक्ष अमरसिंह शेळके आदी उपस्थित होते.